In this 21 century the whole world is came under the influence of globalization. Globalization is the process of economical, political and cultural interdependence among countries. Due to the impact of Globalization, transformation have taken place in Indian society. Transformation is the process of Social, economical, political and cultural Change. Rural Society is an important part of our nation, 69% of Indian Population still lives in rural area. In post independence period, rural transformation have started by introducing various development plans in Sociology. The concept of rural transformation has been interpreted as a complete process of restructuring the society. It tries to undertake features of urban environments into rural settings, changes to systems and processes that favorably impact rural people's standard of living and livelihood. In fact, rural transformation is a more dynamic concept than rural development as it embodies a transformation in people's perspective on life. Number of conferences was organized on Globalization. But in this conference our focus and stress will be on globalization role and impact in rural transformation. This conference will be helpful in generating ideas for developing specific policies for rural transformation in India. Your active participation in the conference will make grand success.

Published By
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

ISSN-2319 9318

Approved Vidyawarta Special Issue January 2018

Special Issue, 28th Feb.2018
International Multilingual Research Journal
Vidyawarta

National Conference
on

# Globalization and Rural Transformation in India

Organised By
**Department of Sociology**
Pandit Dindayal Upadhyaya Education Society's
**SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAYA, PHULAMBRI**
Tq.Phulambri, Dist.Aurangabad
NAAC Accredited with 'B' Grade

Sponsored By
**Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad**

Convener
**Dr.Manjusha Nalgirkar**



# जागतिकीकरण आणि स्त्री शिक्षण

**प्रा.काळे आर.बी.**
स.प्राध्यापकसमाजशास्त्र विभाग
र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई जि.बीड

**प्रा.गोरे बी.डी**
स.प्राध्यापक समाजशास्त्र विभाग
मॉडेल कॉलेज घनसावंगी जि.जालना

**प्रस्तावना :**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाला नेहरु यांनी म्हटलेहोते की, आपल्या देशाचीआर्धी लोकसंख्या (स्त्रिया) अशिक्षीत, आडाणी राहिल्या.शिक्षणात मागे राहिल्या तर आपल्या देशाचा विकास होईल का?शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे.मानवाची महत्त्वाची गरज म्हणूनअन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य या बरोबर शिक्षण महत्त्वाचे आहे.शिक्षण हे सर्वांसाठी महत्त्वाचे असून आपल्या राज्यघटनेतील समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाहीही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी शिक्षण ही बाब महत्त्वाची मानण्यात आली आहे.परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे आणि शिक्षण हेमानवी विकासाचा केंद्र बिंदू आहे. शिक्षणामुळे राष्ट्र, वैज्ञानिक, तांत्रिक, आर्थिक क्षेत्रात सक्षम बनून प्रगतीकडे झेप घेईल असे भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी भारताच्या शैक्षणिक धोरणाबाबत अपेक्षा व्यक्त करतांना म्हटलेहोते. भारताने जागतिकीकरणहे १९९१ सालीस्विकारले. जागतिकीकरणाबरोबरच खाजगीकरण व उदारीकरणहेसुध्दा स्विकारले. आपल्या देशातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थीक प्रगती, औद्योगिक, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती यासारख्या विविध क्षेत्रातील नेतृत्त्वाच्या निर्मीतीसाठी, रोजगाराच्या संधीमध्ये वाढ करण्यासाठी, आपल्या दारिद्र्य निर्मुलनासाठी देशाला शैक्षणिक क्षेत्रातीलविकासाची गरज असते. जगातील सर्वच राष्ट्रांच्या प्रगतीमध्ये त्या त्या देशातील शासनाच्या शैक्षणिक धोरणांचा फार मोठा वाटा आहे.अध्ययन आणिअध्यापन म्हणजेशिक्षण नव्हे तर प्रत्येक व्यक्तींमध्ये असणाऱ्या अंगभूत सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांच्या विकासासाठी संधी उपलब्ध करुन देणे.त्यांच्यातील क्षमतांचा पुरेपुर विकास होण्यासाठीआवश्यकती परिस्थिती सभोवताली निर्माण करणे म्हणजे शिक्षण. शिक्षण हे मानवाच्या विकासाचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.शिक्षणामुळे व्यक्तीची अस्मिता जागृतहोते. मी कोण आहे ? माझे समाजात काय अस्तित्त्व आहे ?याची जाणीव व्यक्तीला शिक्षणामधूनचहोते.शिक्षणाच्या संदर्भात भारतातील वस्तुस्थितीचे चित्र ज्या आकडेवारीवरुन समोर येते, त्या आकडेवारीमध्ये फार मोठा विरोधाभास आहे.दरवर्षी प्रशिक्षित अभियंते निर्माण करण्याच्या बाबतीत जगात भारत हा दुसऱ्या क्रमांकावर असूनत्याच भारतातील शाळेतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण हे जागतिक पातळीवर पहिल्या क्रमांकाचे असून महिलांचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक आहे. (शहरापेक्षा ग्रामीण भागात अधिक आहे )जगातीलबौध्दीक भांडवलाच्या उपलब्धतेबाबत

भारताचे नाव आवर्जून घेतले जात असलेतरी या देशाती ल २५ % लोकसंख्या शिक्षणापासून दूर आहे.जागतिकीकरणानंतर भारतात अतिशय वेगाने वाढणाऱ्या नगरतसेच महानगरातील शाळांमध्येमहागड्या सुविधा एकीकडे आहेत, तर त्याच ग्रामीण व शहरातील काहीसरकारीतसेचखाजगी शाळांमध्ये खडू आणि फळा यासारख्या शिक्षणाच्या मुलभूत सुविधांची कमतरता असलेली दिसते.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१. भारतातील स्त्री शिक्षणाचीस्थिती अभ्यासणे

२. स्त्री शिक्षणाची कारणेअभ्यासून उपाय सुचविणे.

**भारतातील जागतिकीकरणापुर्वी व जागतिकीकरणानंतरस्त्री शिक्षणाचीस्थिती:**


भारतीय समाजामध्येस्त्रीला माता सरस्वती, माँ दूर्गा, महालक्ष्मी इत्यादी नावांनी संबोधले जाते.या भारतीय समाजात माता सरस्वतीला शिक्षणाची आराध्य दैवत मानले जाते.त्याच भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवले होतेहाच विरोधाभास दिसतो.राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षि धोंडो केशव कर्वे, आगरकर आदी यांनी महिला शिक्षण व महिलासुधारणा या कामाला प्राधान्य दिले.महिलांमध्ये स्वाभिमानाची जाणीव निर्माण करुन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करुन महिलांना सक्षम करणे यासाठीमहिलांना शिक्षण देणेही काळाची गरज आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीस्त्री शिक्षणाशिवाय समाजाला तरुणोपाय नाही असेसांगीतलेहोते.तरीसुध्दास्त्रियांचे काम फक्त चार भिंतीच्या आत चूल आणि मूल इतकेच खालील तक्त्यावरुन दिसते.


| अक.्र. | जणगणना वर्ष | स्त्री साक्षरता | पुरुष साक्षरता | एकूण साक्षरता | स्त्री पुरुष-साक्षरतेतील फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९०१ | ०६. | ९ ८३. | ५ ४. | ९ २. |
| २ | १९११ | १ ०. | १० ६. | ५ ९. | ९ ६. |
| ३ | १९२१ | १ ८. | १२ २. | ७ २. | १० ४०. |
| ४ | १९३१ | २ ९. | १५ ६. | ९ ५. | १२ ७. |

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved
Sr.No.62759
Vidyawarta®
February 2018
Special Issue

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

स्त्रोत : भारतीय जनगणना १९०१ ते २००१






वरील तक्त्यावरुन असे दिसते की, भारतामध्ये स्वातंत्र्याअगोदरस्त्री शिक्षणाचे प्रमाण हे कमीहोते, १९०१ सालीभारतातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण ०.६०% होतेतर पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण ९.८३% होते.स्त्री-पुरुष साक्षरतेतील फरक ९.२ % होता.१९२१ सालीस्त्री शिक्षणाचे प्रमाण १.८१ % झालेतर पुरुषांचे १२.२१% झाले.१९५१ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरस्त्री शिक्षणाचे प्रमाण ७.९२% झालेतर पुरुषांचे २४.४४ % झाले.स्त्री- पुरुष साक्षरतेतील फरक १२.३०% होता.१९७१ सालीस्त्री शिक्षणाचेप्रमाण १८.६९% झालेतर पुरुषांचे ४६.१३% झाले.१९९१ सालीस्त्री शिक्षणाचे प्रमाण ३९.२९% झालेतर पुरुषांचे प्रमाण ६४.१३% झाले.जागतिकीकरणानंतरस्त्री शिक्षण वाढले ते २००१ साली.५३.६७% झालेतर पुरुषांचे प्रमाण ७५.२६% झाले.२०११ सालीस्त्रीसाक्षरता ६५.४६% तर पुरुष साक्षरता ८२.१४ % झालीतर दोन्हीमधील फरक १६.६८% इतका आहे.

**स्त्री शिक्षणाचे प्रमाण कमी असण्याची कारणे :**

भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रमाण कमी असण्याची अनेक कारणे जबाबदार आहेतते खालील प्रमाणे :

- दारिद्र्य :भारतात दारिद्र्याचे प्रमाण सुरुवाती पासूनच अधिक आहे. त्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्या कारणाने कुटुंबातील फक्त मुलांना शिकवले जाते. मुलींना घरातील लहानमोठी कामेतसेचआई वडिलांना शेताच्या कामात मदत करणे असे कामकरावे लागते. यामुळे मुलींना शिक्षण घेता येत नाही.

- ग्रामीण भाग : भारतात ग्रामीण भागात जास्त लोकसंख्या राहते. ग्रामीण भागामध्येशिक्षणाच्या सोयी सुविधा अधिक प्रमाणात उपलब्ध नसतात त्यामुळे मुलींना शिकवले जात नाही. म्हणून मुलींना शिक्षणापासून मुकावे लागते.
- पुरुषसत्ताक कुटुंब पध्दती :भारतीय समाजामध्ये कुटुंबात पुरुषांना महत्त्व दिले जाते. पुरुषांचा विचार हाच फक्त विचारात घेतला जातो. पुरुषांच्या मतानुसार कुटुंबामध्ये निर्णय घेतले जातात त्यामुळे कुटुंबातील कोणत्या अपत्याला शिक्षण द्यायचे याचे स्वातंत्र्य पुरुषांना असल्यामुळेघरातील मुलींपेक्षामुलांना अधिक प्रमाणात शिकवले जाते.
- बालविवाह :भारतात बालविवाह प्रथेमूळे मुलींचे विवाह लवकर होत असत / आहेतत्यामुळे विवाह झाल्यानंतरमुलींचे शिक्षण बंद होतेत्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.
- समाजाची मानसिकता :भारतीय समाजामध्ये मुलाला वंशाचा दिवा समजला जातो. मुलाला लागणाऱ्या सर्व सुख सुविधा पुरविल्या जातात. मुलींना मुलांसारख्या सोयी- सुविधा दिल्या जात नाहीततसेच मुलींना मुलांएवढे शिक्षण सुध्दा दिले जात नव्हते. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जायचे.

**स्त्री शिक्षण वाढविण्यासाठी उपाययोजना :**

- दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे : भारतातील जवळ जवळ सर्व समस्यांचे मुळ दारिद्र्यात दडलेले दिसते. दारिद्र्यामुळे व्यक्तींच्या प्राथमिक गरजा पुर्ण करुन उरलेल्या पैशात व्यक्ती शिक्षणावर खर्च करतो. त्यात तो व्यक्ती घरातील मुलांना अगोदर शिक्षणाची व्यवस्था करतो आणि नंतर मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था करतो. त्यामुळे अशा परिस्थितीतस्त्रियांचे शिक्षण कमीहोते अशा वेळी घरातील मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था केलीतर शिक्षणाचे प्रमाण वाढू शकते.
- बालविवाह प्रथा :जागतिकीकरणाच्या काळात भारतीय समाजात शिक्षण वाढले तरीही बालविवाह प्रथा पुर्ण बंद झालेली नाही. बालविवाहामुळे समाजातील अनेक मुलींचे शिक्षण बंद होते. त्यामुळे बालविवाहाची प्रथा समुळ नष्ट झालीतर स्त्रिया शिकतील व स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल.
- समाजाची मानसिकता बदलणे : भारतीय समाजात 'लोक काय म्हणतील' याला जास्त महत्त्व दिले जाते. गावातील एका मुलीचे लग्न शिक्षणासाठी उशिरा झालेतर गावातील सर्व लोक त्या कुटुंबाला नावे ठेवतात. त्यामुळे ग्रामीण भागात मुलींचे लग्न लवकर केले जाते.

व त्यामुळेती मुलगी शिक्षणापासून वंचीत राहते.समाजाचीही नावे ठेवण्याची मानसिकता बदलायला हवी तेव्हाच खऱ्या अर्थानेस्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढू शकते.

- शिक्षणाचा खर्च कमी करणे : जागतिकीकरणाच्या काळात शिक्षण घेणे सर्व सामान्यांच्या अवाक्याबाहेरचे झाले आहे. अशा वेळी घरातील व्यक्ती घरातील सर्व मुलांना शिकवत नाहीत विशेषतः मुलींनात्यामुळे शिक्षण दिले जात नाही. त्यामुळे शिक्षण हे सर्व सामान्यांना परवडेल असे स्वस्त असायला पाहिजे.
- कायद्याची प्रभावी अंमलबजावणी : शिक्षणाचा मुलभूत हक्क या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केलीतरस्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास मदतहोईल.

**समारोप :**

जागतिकीकरणानंतर भारतीय समाजात परिवर्तन झाले. शिक्षणाचे प्रमाण वाढले परंतु पुरुषांच्या शिक्षणाच्या प्रमाणात स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले नाही. अजुनही ३५% स्त्रिया शिक्षणापासून दूर आहेत.स्त्री शिकलीतर स्वतः उन्नत व प्रगत होतेच पण तिच्या बरोबर संपुर्ण कुटुंबाचा व राष्ट्राचा विकास होतो.

**संदर्भसुची :**

१. भारताचे संविधान (१०० व्या घटनादुरुस्तीसह) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साद प्रकाशन, औरंगाबाद २०१६

२. भारतीय जनगणना १९०१ ते २०११

३. २१ वी सदीमें महिलासशक्तीकरण - चौहाण - कदम शैला, पराग प्रकाशन, कानपूर २०१६

४. शिक्षण आणि ग्रामीण विकास - सुरवसे मगन, नुतन प्रकाशन, पुणे १९८७

५. समानतेसाठी शिक्षण महाराष्ट्र राज्य शैक्षणिकसंशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे१९६८

६. योजना - जुन २०११